दैनिक

MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 175, Marathi Daily Saturday, Date - 03 January 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक १७५ वा | मराठी दैनिक | शनिवार दि. ०३ जानेवारी २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय

साप्ताहिक महिला संवाद,

गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# अर्ज मागे घेण्यावरुन मनसे पदाधिकाऱ्याला संपवलं

## सोलापुरात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय राडा; मनसे पदाधिकाऱ्याची हत्या

**सोलापूर । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सोलापुरात राजकीय वादातून भाजपमधील दोन गटात टोकाचा वाद झाल्याच चित्र पाहायला मिळालं. महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी चांगलाच राडा झाला.

सोलापुरातील जोशी गल्ली परिसरातील भाजपचे माजी नगरसेवक शंकर शिंदे यांचे संपर्क कार्यालय भाजपच्याच दुसऱ्या गटाने फोडले. आपल्या समर्थक उमेदवारास उमेदवारी न मिळाल्याच्या करणावरून दुसऱ्या गटाने कार्यालय फोडल्याचा आरोप करण्यात आला. यावेळी, पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावून हस्तक्षेप केला.

मात्र, येथील राड्यातच एका तरुणाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दरम्यान, या घटनेनंतर महापालिका परिसरातील घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात आहे.

सोलापूर शहरात राजकीय वादातून एकाची हत्या करण्यात आली असून बाळासाहेब सरवदे असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मनसे विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी असलेल्या बाळासाहेब सरवदे यांची राजकीय वादातून हत्या झाल्याचा आरोप केला जात असून या घटनेनं परिसरात खळबळ उडाली आहे. सोलापूर महापालिका प्रभाग २ मध्ये अर्ज माघारी घेण्यावरून आज भाजपच्या दोन गटात वाद झाला.

प्रभाग दोनमध्ये शालन शिंदे ह्या भाजपच्या अधिकृत उमेदवार आहेत, तर त्यांच्याविरोधात भाजपच्या बंडखोर रेखा सरवदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. रेखा सरवदे यांनी अर्ज माघारी घ्यावा यासाठी शिंदे आणि सरवदे या दोन गटात मोठा वाद झाला, या वादात भाजप नेते शंकर शिंदे यांचे कार्यालय देखील फोडण्यात आले. मात्र, त्याचवेळी शिंदे गटाच्या



लोकांनी मध्यस्तीसाठी आलेल्या बाळासाहेब सरवदे यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप सरवदे यांच्या नातेवाईकांनी केला आहे. ह्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या बाळासाहेब सरवदे यांना उपचारासाठी सोलापूरच्या सहकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. या घटनेनंतर शहरात तणावाचे वातावरण असून पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. दरम्यान, बाळासाहेब सरवदे हत्याप्रकरणातील ४ संशयितांना सोलापुरातील जेलरोड पोलिसांनी ताब्यात घेतले असून उर्वरित आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरु आहे.

दरम्यान, प्रभाग २ मधून भाजप आमदार विजयकुमार देशमुख यांचे पुत्र किरण देशमुख हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. हे संपूर्ण पॅनल बिनविरोध करण्यासाठी भाजपकडून मोठा दबाव होता, त्यामुळे सरवदे कुटुंबावर भाजप नेत्यांकडून दबाव आणला जातं होता. समाजात वाद नको म्हणून ते सोडवायला मनसे नेते बाळासाहेब सरवदे गेले होते. त्यावेळी शिंदे गटातील लोकांनी त्यांची हत्या केल्याचा आरोप मनसेचे पदाधिकारी प्रशांत इंगळे यांनी केला आहे. मनसेचे लोकसभा क्षेत्र प्रमुख प्रशांत इंगळे यांनी हा गंभीर आरोप केला आहे.

## थोडक्यात...

### आई-वडिलांची सेवा हीच मोठी ईश्वर सेवा - ह.भ.प. अंजली घुंगरड

**परतूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील हातडी येथे नवनिर्मित आई तुळजाभवानी आणि दिगंबर महाराज यांच्या मंदिर निर्माण सोहळ्यानिमित्त आयोजित भव्य यज्ञ व कीर्तन महोत्सवात युवा कीर्तनकार हभप. अंजली घुंगरड यांनी समाजप्रबोधनाचा जागर केला. 'धन्य मी मानेन आपुले संचित, राहिलेसे प्रीत तुझे नामी' या जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या अभंगावर निरूपण करताना त्यांनी भारतीय संस्कृती, संस्कार आणि व्यसनमुक्तीचे महत्त्व अधोरेखित केले.

हातडी येथे मंदिर निर्माणानिमित्त दररोज सायंकाळी हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. १ जानेवारी रोजी रात्री ८ ते १० या वेळेत परतूर येथील राधामाधव वारकरी शिक्षण संस्थेची विद्यार्थिनी हभप. अंजली घुंगरड हिचे कीर्तन संपन्न झाले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, तुकोबारायांनी नामस्मरणाच्या जोरावर स्वतःच्या आयुष्याचे सार्थक केले. आपणही आपल्या कार्यक्षेत्रात काम करताना ईश्वराचे नामस्मरण सोडता कामा नये. भारतीय संस्कृती ही संस्कारांवर टिकून आहे. या देशातील स्त्री ही सुसंस्कृत आणि मधुर भाषिणी असावी, तर मुलांची वर्तणूक ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांसारखी करारी आणि नीतिमत्ता जपणारी असावी.

आजच्या धावपळीच्या युगात माणूस पैशाच्या मागे धावताना सुखाचा शोध घेत आहे. मात्र सुख हे नाशवंत असून खरा आनंद हा अविनाशी आहे. हा आनंद मिळवण्यासाठी शुद्ध शाकाहारी आहार, व्यसनमुक्त जीवन आणि सात्त्विक विचारांची जोड आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विशेषतः तरुण पिढीने आपल्या आई-वडिलांची जन्मभर सेवा करावी, कारण माता-पित्याची सेवा हीच जगातील सर्वात मोठी ईश्वर सेवा आहे, असे भावनिक आवाहन त्यांनी यावेळी केले. या कीर्तन सोहळ्याला हातडी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शाळांची गुणवत्ता वाढविण्याला प्राधान्य - सीईओ मिन्नू

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी आपली प्राथमिकता आहे. त्या अनुषंगाने सक्षम जालना अंतर्गत पहिल्या टप्प्यात यावर्षी जालना तालुक्यातील १० शाळांमध्ये जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून गुणवत्ता विकास अभियान राबविण्यात येत असून, आपले या कार्यक्रमावर अभियान पूर्ण होईपर्यंत वैयक्तिक लक्ष आहे. फाउंडेशन आणि शिक्षक यांच्या एकत्रित प्रयत्नातून या शाळा गुणवत्तेच्या बाबतीत मॉडेल बनतील, असा विश्वास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी. एम. यांनी येथे बोलताना व्यक्त केला.

श्रीमती मिन्नू यांनी शुक्रवार दि. २ जानेवारी रोजी जालना एज्युकेशन फाउंडेशनला भेट देऊन, जिल्हा परिषदेच्या १० शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या अभियनाची माहिती जाणून घेतली.

**प्रतिनिधी पाहिजेत**

पत्रकार होण्याची सुवर्ण संधी ?

जालना आणि पुणे येथून,प्रकाशित होणारे दैनिक महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा,तालुका आणि सर्कलसाठी प्रतिनिधी पाहिजेत. सामाजिक,शैक्षणिक,धार्मिक,राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर संपर्क सांधावा.

दैनिक महिला संवाद कार्यालय

- मुख्यकार्यालय पत्ता - गांधी चमन,सावित्रीबाई फुले चौक, जालना 9168567111

- विभागीय कार्यालय पत्ता - सी-२०३,अनंत पार्क,काळेवाडी रोड,राहटनी, धनगर बाबा मंदिरजवळ, पुणे शहर,पुणे-४११०१७(महाराष्ट्र)

mahilasanvad11@gmail.com https://epaper.mahilasanvad.com

# विटभटीवरच्या चिमुकल्या लहान मुलांना स्वेटर आणि खाऊचे वाटप

**वसमत । प्रतिनिधी**

दिनांक ३१ डिसेंबर २०२५ वार बुधवार रोजी तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथील निवासी मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना आणि विटभटीवरच्या चिमुकल्या लहान मुलांना स्वेटर आणि खाऊचे वाटप करून माणुसकीची ऊब देण्यात आली.



मूकबधिर विद्यार्थ्यांना उबदार साथ नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी त्यांना शैक्षणिक आणि उज्वल भविष्य घडवण्यासाठी त्यांना एक नवी प्रेरणा आणि वाटचालीचे आमच्यासर्वांकडून त्यांना एक त्यांच्या मनात एक नवी ऊर्जा जागू ही आमचा एक सर्वांचा संकल्प त्यांच्यापुढे मांडला की तुम्ही पण आयुष्यात खूप पुढे जा आणि भावी वाटचालीसाठी तुम्हाला शुभेच्छा कुठे वायफळ खर्च कुठे पार्टी किंवा फालतू खर्च न करता माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे आणि माणुसकी टिकवून ठेवावी असा संदेश नवीन वर्षानिमित्त या सर्व मान्यवरांनी दिलेला आहे आणि सर्व जनतेला या संदेशांमधून सांगितलेले आहे की माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे आणि एकमेकांची मदत करावी तेव्हाच माणुसकी जपली जाईलएक चांगला उपक्रम राबविला मायेची शाल उपस्थित मान्यवर . धिरज महाराज, फुलउमरीकर माननीय श्री संदीप आडे साहेब महसूल अधिकारी मानोरा तहसील कार्यालय श्री. देवकर साहेब महसूल कर्मचारी श्री. उमेश महल्ले, श्री. गजानन नागफासे साहेब श्री. संतोष मनवर, रुई, श्री. दिलीप राऊत, अजनी, श्री. विजय काजळे, कारखेडा यांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच सामाजिक क्षेत्रातून श्री. भीमराव महाराज, उमरी बु. श्री. अजित चव्हाण, पाळोदी, श्री. प्रतिक वाघमारे, पाळोदी, श्री. रोशन जाधव, हातना, फरीदभाई,भांडेगाव चिखली, दारव्हा, शादाब शेख, दारव्हा, श्री. रघुनाथ इंगोले, आसोला इंगोले, श्री. दुर्गादास जाधव, कारखेडा, श्री. गौरव राठोड, खापरी, श्री. प्रवीण डाखोरे, गिरोली, श्री. अंकुश गावंडे, देवठाणा, श्री. प्रवीण गावंडे, मोहरी, श्री. सतीश हरसुले, पोहरादेवि आदींनी मदतीचा हात पुढे केला.

# प्रभाग क्रमांक २३ वंचित बहुजन आघाडीचा सौ. रेखाताई नरेंद्र माने यांना नैतिक व राजकीय पाठिंबा

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ च्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने प्रभाग क्रमांक २३ (थेरगाव साईनाथ नगर, पडवळ नगर, अनुसूचित जाती-जमाती आरक्षित) बाबत महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली आहे. या प्रभागातून वंचित बहुजन आघाडीतर्फे कोणताही अधिकृत उमेदवार देण्यात आलेला नसल्याचे पक्षाने जाहीर केले आहे. दरम्यान, सदर प्रभागातून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवार सौ. रेखाताई नरेंद्र माने यांनी वंचित बहुजन आघाडीकडे पाठिंब्याबाबत लेखी पत्र सादर केले होते. त्या पत्राच्या अनुषंगाने स्थानिक वंचित बहुजन आघाडीचे संघटक श्री. अमोल सावदेकर यांच्याशी सविस्तर चर्चा व विचारपूस करण्यात आली.



तसेच या विषयावर पक्षातील जबाबदार पदाधिकारी व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन सखोल चर्चा करण्यात आली. उमेदवारांचे सामाजिक कार्य, नागरिकांशी असलेला थेट संपर्क, तसेच मतदारांमध्ये असलेली विश्वासार्हता लक्षात घेता वंचित बहुजन आघाडीतर्फे सौ. रेखाताई नरेंद्र माने यांना प्रभाग क्रमांक २३ मधून नैतिक व राजकीय पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा पाठिंबा संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय आणि बहुजन हिताच्या भूमिकेच्या आधारे देण्यात येत असून, वंचित बहुजन आघाडी सौ. रेखाताई नरेंद्र माने यांच्या निवडणूक वाटचालीत पाठिंब्याचे मित्र म्हणून सोबत राहील, असेही पक्षातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामुळे प्रभाग क्रमांक २३ मधील निवडणूक लढतीला नवे राजकीय वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अल्पवयीन मुलीची छेड काढणाऱ्याला नागरिकांचा चोपमाफी मागायला लावून काळे फासले

**छ.संभाजीनगर । विजया कांबळे**

शहरातील हडको परिसरात एका अल्पवयीन मुलीची छेड काढणाऱ्या व्यक्तीला नागरिक आणि राजकीय कार्यकर्त्यांनी बेदम चोप दिल्याची घटना गुरुवारी (१ जानेवारी) दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेनंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून पोलिसांनी संशयित व्यक्तीला ताब्यात घेतले आहे.

हडको भागात दुपारी २ च्या सुमारास छेडछाडीचा प्रकार घडल्यानंतर राजकीय कार्यकर्ते रमेश इधाटे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या वेळी संतप्त झालेले नागरिक आणि कार्यकर्त्यांनी संबंधित व्यक्तीला पकडून जाब विचारत चोप दिला.

अशा प्रवृत्तींना जरब बसावी यासाठी सार्वजनिकरीत्या त्या व्यक्तीकडून पीडित मुलीची माफी मागायला लावून त्याचे तोंड काळे करण्यात आले.



रमेश इधाटे यांनी या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केला असून तो शहरात मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच सिडको पोलिसांनी तातडीने धाव घेत संबंधित व्यक्तीला ताब्यात घेतल

# मुंबईकरांना थर्टी फर्स्टचं सेलिब्रेशन पडलं महागात! एका रात्रीत तब्बल दीड कोटींचा दंड

**मुंबई । प्रतिनिधी**

देशभरात सर्वत्र नवीन वर्षाचे उत्साहात स्वागत करत सरत्या वर्षाला निरोप देण्यात आला. २०२६ च्या स्वागतासाठी मुंबईतील अनेक लोक हे रस्त्यावर उतरलेले पाहायला मिळाले. मुंबईतील रस्त्यांवरील सुरक्षा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी शहरात ऑपरेशन ऑल आऊट राबवले होते. ३१ डिसेंबरच्या रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या विशेष मोहिमेत वाहतूक नियमांची पायमल्ली करणाऱ्या हजारो वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवणाऱ्या २११ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तर या कारवाईद्वारे पोलिसांनी एकूण १ कोटी ३१ लाख १४ हजार ८५० रुपयांचा दंड ई-चलानद्वारे आकारला आहे.

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला मुंबईतील सर्व प्रमुख चौक, एन्ट्री पॉईंट्स आणि गर्दीच्या ठिकाणी पोलिसांनी कडेकोट नाकाबंदी केली होती. सार्वजनिक सुरक्षिततेचा विचार करून पोलिसांनी आधुनिक ब्रेथअलायझरचा वापर करून वाहनचालकांची तपासणी केली. पोलिसांनी आधीच जनजागृती केली असतानाही अनेक चालकांनी नियमांकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले. मुंबई वाहतूक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवल्याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत २११ गुन्हे नोंदवण्यात आले.

मद्यपान करून वाहन चालवणे हे केवळ स्वतःसाठीच नाही तर इतरांसाठीही जीवघेणे ठरू शकते, त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये कोणतीही दया दाखवली जाणार नाही असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला होता. तरीही काही उत्साही मद्यपी रस्त्यावर उतरले होते. पोलिसांनी वारंवार आवाहन करूनही मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांची संख्या लक्षणीय होती. रात्री १० वाजेपासून सुरू झालेली ही तपासणी पहाटेपर्यंत सुरू होती.

केवळ ड्रंक अँड ड्रायव्हिंगच नव्हे, तर इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवरही पोलिसांनी कडक कारवाई केली. रस्ते सुरक्षेच्या इतर नियमांकडे दुर्लक्ष



करणाऱ्यांवरही पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. यात एकूण १३,७५२ ई-चलान कापण्यात आले. यात प्रामुख्याने दुचाकीस्वारांनी हेल्मेट न वापरल्यामुळे मोठ्या प्रमाणात दंड आकारण्यात आला. तसेच ट्रिपल सीट प्रवास करणे, रॉन्ग साईड ड्रायव्हिंग करणे, सीट बेल्ट न लावणे, वेगाने गाडी चालवणे आणि सिग्नल तोडणाऱ्यांचे फोटो सीसीटीव्हीद्वारे कैद करून त्यांना थेट दंड लावण्यात आला. या सर्व कारवायांतर्गत एकूण १३,७५२ ई-चलान जारी करण्यात आली. या माध्यमातून मुंबई पोलिसांनी एकूण १,३१,१४,८५० रुपये दंड आकारला आहे.


वाहतूक पोलिसांनी या कारवाईपूर्वी सोशल मीडिया आणि बॅनरच्या माध्यमातून ऊ ीं ऊळपज्ञ रपव ऊीळींश अशी मोहीम राबवून जनजागृती केली होती. मात्र, बेपरवाईने वागणाऱ्या चालकांमुळे पोलिसांना ही कठोर पावले उचलावी लागली. या मोहिमेमुळे नवीन वर्षाच्या रात्री मुंबईत कोणताही मोठा किंवा भीषण अपघात झाला नाही, हे पोलिसांचे मोठे यश मानले जात आहे. शहरात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलाने रात्रभर गस्त घातली होती. ज्यामुळे मोठ्या अपघातांच्या घटना टाळल्या गेल्या.

## संपादकीय...

### राजकीय वादातून तरुणाची हत्या

सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडलेली बाळासाहेब सरवदे यांची हत्या ही केवळ एका व्यक्तीची हत्या नसून, ती लोकशाही प्रक्रियेवर पडलेली काळी छाया आहे. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या प्रक्रियेतून सुरू झालेला राजकीय वाद थेट हिंसाचार आणि हत्येपर्यंत पोहोचतो, हे अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी असतात. मात्र सोलापुरात सत्तासंघर्ष, गटबाजी आणि दबावाचे राजकारण इतके टोकाला गेले की, एका तरुणाला आपला जीव गमवावा लागला. मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या व्यक्तीवरच जीवघेणा हल्ला होतो, ही बाब समाजासाठी आणि राजकारणासाठी धोक्याची घंटा आहे. राजकीय पक्षांतर्गत मतभेद हे लोकशाहीत अपेक्षित असले तरी ते संवादातून, नियमांच्या चौकटीत सोडवले जाणे गरजेचे असते. उमेदवारीसाठी दबाव, कार्यालयांची तोडफोड आणि त्यातून निर्माण होणारी दहशत ही प्रवृत्ती लोकशाहीला घातक आहे. अशा घटनांमुळे सामान्य नागरिकांचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास डळमळीत होतो. या प्रकरणात पोलिसांनी तातडीने आणि निष्पक्ष तपास करणे अत्यावश्यक आहे. दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, तरच कायद्याचा धाक निर्माण होईल. त्याचबरोबर सर्व राजकीय पक्षांनीही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. सत्ता आणि वर्चस्वाच्या स्पर्धेत समाजातील शांतता, माणुसकी आणि कायद्याचे भान हरवू नये, हीच या घटनेतून घ्यायची खरी शिकवण आहे. लोकशाही टिकवायची असेल, तर निवडणुका रक्तरंजित संघर्षाचे मैदान न होता विचार, विकास आणि जनहिताच्या स्पर्धेचे व्यासपीठ बनल्या पाहिजेत.

# सावित्रीबाई फुले : विचारांचा दीप, समाजपरिवर्तनाचा मार्ग





भारतीय समाजाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासात सावित्रीबाई फुले यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे अंधाराला छेद देणाऱ्या प्रकाशरेषेसारखे आहे. शिक्षण, समता आणि मानवमूल्यांचा पुरस्कार करणारी ही स्त्री केवळ आपल्या काळाची साक्षीदार नव्हती, तर त्या काळाच्या विरोधात उभी राहून इतिहास घडवणारी क्रांती होती. स्त्री शिक्षण म्हणजे अधर्म मानणाऱ्या समाजात सावित्रीबाईंनी शिक्षणालाच धर्म ठरवले.

उन्निसाव्या शतकातील समाज अज्ञान, जातीय विषमता आणि स्त्रीदास्याच्या जोखडात अडकलेला होता. अशा काळात सावित्रीबाई फुले यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या खांद्याला खांदा लावून शिक्षणाचा मार्ग स्वीकारला. १८४८ साली पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू करणे हे केवळ शैक्षणिक पाऊल नव्हते, तर व्यवस्थेला दिलेले थेट आव्हान होते.

समाजाकडून अपमान, बहिष्कार, दगडधोंडे यांचा मारा सहन करतानाही त्यांच्या हातातील वही आणि मनातील ध्येय कधीही ढळले नाही.

दगडांच्या वर्षावातही, हातातील दिवा
विझला नाही,
अज्ञानाच्या अंधारात, तिचा विचार
हरवला नाही.

ही कविता केवळ शब्दांची रचना नाही, तर सावित्रीबाईंच्या संघर्षमय जीवनाची साक्ष आहे. त्यांच्या वाटेवर पडलेले दगड हे अडथळे नव्हते, तर परिवर्तनाचे पायऱ्या ठरल्या. समाजाने बहिष्कृत केलेल्यांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडताना त्यांनी स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा आत्मविश्वास दिला. सावित्रीबाईंचे कार्य शाळेच्या चौकटीपुरते मर्यादित नव्हते. विधवा पुनर्विवाह, बालविवाह विरोध, अस्पृश्यता निर्मूलन आणि दलित उत्थान यांसाठी त्यांनी निर्भीड भूमिका घेतली. गर्भवती विधवांसाठी उभारलेले 'बालहत्या प्रतिबंधक गृह' हे त्यांच्या करुणेचे आणि सामाजिक धैर्याचे मूर्त रूप होते. स्त्रीच्या शिक्षणातून घडली, समाजाच्या स्वप्नांची पहाट, सावित्री नाव म्हणजे, क्रांतीची अक्षरशः साक्षात.

१८९७ साली पुण्यात प्लेगची भीषण साथ पसरली असताना, सावित्रीबाईंनी स्वतः चा जीव धोक्यात घालून रुग्णांची सेवा केली. सेवा हा त्यांच्यासाठी उपदेश नव्हता, तर जीवनधर्म होता. अखेर त्या सेवेतच त्यांचे जीवन संपले; मात्र त्यांनी पेटवलेला विचारांचा दीप आजही समाजमन उजळवत आहे.

आजही स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि न्यायासाठी संघर्ष संपलेला नाही. अशा वेळी सावित्रीबाई फुले यांचे जीवनकार्य हे केवळ स्मरणासाठी नव्हे, तर अनुकरणासाठी आहे. शिक्षणाशिवाय मुक्ती नाही आणि समतेशिवाय समाज नाही-हा संदेश त्यांनी आपल्या आयुष्याने दिला.

सावित्रीबाई फुले म्हणजे इतिहासातील एक पान नव्हे, तर वर्तमानाला प्रश्न विचारणारी आणि भविष्यास दिशा देणारी विचारयात्रा आहे. त्या विचारांचा दीप पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे, हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

**ज्योती आडेकर,**
संपादक
दैनिक महिला संवाद वर्तमानपत्र

# आठ कोटींच्या फसवणुकीनंतर निवृत्त IPS अधिकाऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न, मिरा रोड भाजप पदाधिकाऱ्याकडे बोट

**मुंबई । प्रतिनिधी**

पंजाब पोलिसामधील निवृत्त आयपीएस अधिकारी अमर सिंह चहल यांची फसवणूक प्रकरणात मिरा रोड भाजपच्या पदाधिकाऱ्यावर संशय व्यक्त केला जात आहे. पंजाब पोलिसांची टीम मिरा रोडमध्ये पोहोचली असून त्यांची भाजप पदाधिकारी शेरा ठाकूर आणि त्याच्या साथिदारांची चौकशी केली आहे. शेरा ठाकूर यानेच आठ कोटी फसवणूक केल्याने अमर सिंग चहल यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे.

पंजाब पोलीस दलातील माजी सेवानिवृत्त अधिकारी अमर सिंह चहल यांची प्रकृती अत्यवस्थ असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत

. या घटनेनंतर समोर आलेल्या मोठ्या सायबर फसवणूक प्रकरणामुळे देशभरात खळबळ उडाली आहे.



या प्रकरणात मिरा-भाईंदर येथील भाजप पदाधिकारी शेरा ठाकूर आणि त्याच्या साथीदारांवर मोठ्या प्रमाणावर सायबर फसवणूक केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या संदर्भात तपासासाठी पंजाब पोलीस महाराष्ट्रात दाखल झाले असून, नवघर पोलीस ठाण्यात चौकशी सुरू आहे. तपासादरम्यान काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.

तपास यंत्रणांना मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शेरा ठाकूर आणि संबंधित पदाधिकाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये कोट्यवधी रुपयांचे संशयास्पद आर्थिक व्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात शेरा ठाकूरचा एक जवळचा साथीदार ताब्यात असून, याच टोळीत 'पांडे' नावाचा कुख्यात बुकीही सहभागी असल्याची माहिती समोर आली आहे. पांडे हा यापूर्वीही सट्टेबाजी प्रकरणात संशयित राहिलेला आहे.

दरम्यान, मिरा-भाईंदर परिसरात क्रिकेट सट्टा आणि इतर बेकायदेशीर जुगार चालवल्याचे धागेदोरे या प्रकरणाशी जोडले जात आहेत. आर्थिक व्यवहार, डिजिटल पुरावे आणि बँक खात्यांचा सखोल तपास सुरू असून, आगामी काळात आणखी मोठी कारवाई होण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे.

या संपूर्ण प्रकरणावर राजकीय प्रतिक्रिया देखील उमटू लागल्या आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शेरा ठाकूर हा आरोपी नरेंद्र मेहता यांच्या भावाचा व्यावसायिक भागीदार असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे हे प्रकरण आणखी गंभीर व संवेदनशील बनले आहे.

# सैनिक कल्याण विभागात लिपिक-टंकलेखक पदभरतीसाठी अर्ज सादरीकरणास मुदतवाढ

**मुंबई । प्रतिनिधी**

सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत लिपिक टंकलेखक (गट-क) सरळसेवेतील पदभरतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत वाढवण्यात आली आहे, अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ९ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत वाढविण्यात आली असल्याचे मुंबई शहराचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

या भरतीसंदर्भातील जाहिरात १२ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती, तर शुद्धिपत्रक ७ डिसेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आले होते. संबंधित भरतीसाठी विभागाच्या संकेतस्थळावर अर्ज भरण्यासाठीची लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती. मात्र तांत्रिक कारणास्तव सैनिक कल्याण विभागाचे संकेतस्थळ २६ डिसेंबर २०२५ पासून निष्क्रीय झाल्याने इच्छुक उमेदवारांना वेबलिंकपर्यंत पोहोचण्यात अडचण येत असल्याने मुदत वाढ देण्यात आली आहे.

विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उमेदवारांनी खालील थशल डळपज्ञ किंवा ट्ठ उेवश चा वापर करून ऑनलाईन अर्ज भरावा. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ९ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे.

# बिनविरोधाच्या नावाखाली दहशत, धमक्या आणि पैसा - संजय राऊत यांचा निवडणूक यंत्रणेवर गंभीर आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

बिनविरोध निवडून येण्यासाठी जी स्पर्धा सुरू झाली आहे त्यामध्ये फक्त धमक्या पैशाचा वापर, ब्लॅकमेलिंग, दहशत सुरु आहे. इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये कधी महानगरपालिकेला बिनविरोध लोकं निवडून आलेच नव्हते. कल्याण डोंबिवलीमध्ये ही स्पर्धा भाजप आणि मिंधे गटात लागली आहे. त्यासाठी निवडणूक यंत्रणेचा गैरवापर होत आहे. या राज्याच्या निवडणूक आयुक्तांचे नाव दिनेश वाघमारे आहे. त्यांनी नावाला जागत या वाघमारेंनी निदान लांडग्याना तरी माराव, हे त्यांना सामील आहेत की काय? अशा शब्दात शिवसेना खासदार संजय राऊत यांनी तोफ डागली.

संजय राऊत म्हणाले की, हे निवडणूक अधिकारी धमक्या देत आहेत. संबंधित पालकमंत्र्यांचा दबाव आहे. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचं वातावरण कधीच निर्माण झालं नव्हतं ते आता भाजप, मिंधे आणि अजित पवारांनी सुरु केलं. त्यांनी सांगितले की, जे निवडणूक अधिकारी आहेत. जे आरओ आहेत त्यांच्यावर अनेक मंत्र्यांकडून दबाव येत आहे. गेल्या दोन-तीन दिवसापासून अनेक मंत्र्यांचे फोन त्यांना जात आहेत. आचारसंहिता लागू आहे पण उपमुख्यमंत्री जे ठाण्यातील आहेत त्यांच्या निवासथानाबाहेर सरकारी अधिकाऱ्यांच्या गाड्यांचा ताफा उभा होता. त्याच्यामध्ये काही आरओ होते. ठाण्यात



मोठ्या प्रमाणात अर्ज बाद करण्यात आले. हे सर्व विरोधी महाविकास आघाडीमधील आहेत. यांचे फोन रेकॉर्ड तपासला पाहिज निवडणूक आयोग, त्यांना कोणत्या मंत्र्यांचे कधी फोन गेले, डेप्युटी सीएमचे कधी फोन गेले आणि त्यानुसार कोणते उमेदवारी अर्ज हे बाद केले.

अधिकाऱ्यांनी जर आचार संहितेचे पालन स्वतः केलं नाही तर त्यांनी उमेदवारांना आणि जनतेला कोणत्या आधारावर ते सांगतात की आचार संहितेचे पालन करा, अशी विचारणा त्यांनी केली. उमेदवारांनी माघार घ्यावी यासाठी आरओच्या माध्यमातून दबाव आणले जात आहे. माझ्या माहितीप्रमाणे विधानसभा अध्यक्षांचे सीसीटीव्ही फुटेज गायब कसं होतं? भूषण गगराणी हे पालिकेचे आयुक्त आहेत. ते सुद्धा या कट कारस्थानामध्ये सामील झाले आहेत का? जळगावला उमेदवारांचे किडनॅपपिंग केलं माघार घेत नाही म्हणून आणि जबरदस्तीने माघार घ्यायला लावली, असेही संजय राऊत म्हणाले.

# धान/भरडधान्य खरेदीकरिता शेतकऱ्यांच्या नोंदणी प्रकियेला ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत मुदतवाढ

**मुंबई । प्रतिनिधी**

खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान/भरडधान्य खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणी करिता ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याचे अन्न , नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने कळविले आहे.

शेतकरी नोंदणीस देण्यात आलेल्या मुदतवाढ कालावधीत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करुन शेतकऱ्यांच्या नोंदणीची कार्यवाही करण्याबाबत विभागाने संबंधित यंत्रणांना सूचित केले आहे. शेतकरी नोंदणीसाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत होती, तिला वाढ देण्याबाबत लोकप्रतिनिधीनकडून तसेच विविध स्तरावरुन मागणी होती.

त्याअनुषंगाने खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये धान/भरडधान्य खरेदीकरिता शेतकऱ्यांच्या नोंदणी प्रकियेला ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

# भाजपच्या रणनीतीवर मराठा समाज संतप्त; पूजा मोरे प्रकरणाने खळबळ

## 'लायकी बघून बोला' - लक्ष्मण हाके यांना मराठा समाजाचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महापालिकेसाठी भाजपकडून अर्ज भरलेल्या पूजा मोरे-जाधव यांना उमेदवारी अर्ज माघार घेण्याची नामुष्की ओढवली. भाजप समर्थकांनी आणि मराठा समाजाविरोधातील लोकांनीच पूजा मोरे यांना ट्रोल केल्यानेच अर्ज मागे घेतला. प्रा.लक्ष्मण हाके यांनी पूजा मोरेवर टीका करताना आपली लायकी बघावी. विचारांशी तडजोड करून पूजा मोरेंनी तिकीट मिळवलं. भाजपची रणनीती खूप वेगळी आहे, त्यांच्यावर निष्ठावंतांनी विश्वास ठेवण्याची गरज नाही. धनंजय जाधव यांनी रडण्याऐवजी लढत त्याच वार्डामधील भाजपची दहा लोक पाडण्याची ताकद धनंजय जाधव यांनी ठेवली पाहिजे, अशी संतप्त प्रतक्रिया बीडमधील मराठा समाजाने दिली. पूजा मोरे मुळच्या बीड तालुक्याती गेवराईच्या आहेत.

भाजपच्या काही लोकांनी आणि मराठा विरोधकांडून पूजा मोरे यांना ट्रोल केलं गेलं. त्यामुळे त्यांना आपला अर्ज मागे घ्यावा लागला. पूजा मोरे आक्रमकआणि अभ्यासू नेतृत्व आहे आणि त्या कमी वयाच्या आहेत. म्हणून त्यांना पुणे महापालिकेच्या सभागृहात काम करण्याची संधी मिळायला पाहिजे होती. याचा उपयोग वंचित शोषितांचा आवाज म्हणून त्यांनी काम केले असते, असेही त्यांनी नमूद केले. लक्ष्मण हाके यांनी टीका करण्याआधी आपली लायकी बघावी त्यांना विधानसभेत फक्त २५३ मतदान पडले होते हे हाके विसरले आहेत. पूजा मोरे या पंचायत समिती सदस्य राहिलेल्या आहेत. पूजा मोरे यांनी विधानसभा निवडणूक लढवली त्यांना २००० पेक्षा अधिक मतं पडली होती. लक्ष्मण हाके उंटाचा मुका घ्यायला जाऊ नका महागात पडेल, तुम्ही तुमची लायकी बघून काम करा, पाकीट घेऊन नको तिथं तोंड घालू नका, असा इशाराही दिला.



पूजा मोरे यांनी पहलगाममध्ये सर्वधर्मसमभाव जपण्यासाठी केलेले वक्तव्य चुकीच्या पद्धतीने ट्रोल करून दाखवले गेले. भाजप विरोधात कोणी बोललं तर आम्ही काय काय करतो हे दाखवण्यासाठी अर्ज मागे घ्यायला लावला गेला. आम्ही मराठा सेवक म्हणून भारतीय जनता पार्टीचा जाहीर निषेध करतो. महाराष्ट्रामध्ये राजकारणाचा तमाशा केला गेला आहे. पूजा मोरे या पुरोगामी विचाराच्या होत्या. मात्र, त्यांनी भाजपचे उमेदवारी मिळवली आणि त्यामुळेच मूळचे भाजपमधील काम करणारे दुखावले गेले असतील त्याचाच परिणाम त्यांना ट्रोल करण्यात आले, असेही त्यांनी नमूद केले. धनंजय जाधव हे मराठ्यांचे पुढारी आहेत संभाजीराजे भोसले यांचे निकटवर्तीय आहेत. असे असताना त्यांनी रडण्याऐवजी लढत त्याच वार्डामधील भाजपचा नगरसेवकाच्या पराजयासाठी अपक्ष उभारलं पाहिजे, भाजपची दहा लोक पाडण्याची ताकद धनंजय जाधव आणि ठेवली पाहिजे, अशीही प्रतिक्रिया दिली.

# महानगरपालिकेला करदात्यांनी तारले!

## निवडणूक खर्चासाठी शासनाचा निधी अप्राप्त; करवसुलीतून मिळाले साडेतीन कोटी

**जालना । प्रतिनिधी**

राज्यातील २९ वी महानगरपालिका म्हणून दोन वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेल्या जालना शहर महानगरपालिकेची ही पहिलीच निवडणूक आहे. मात्र, मनपाच्या तिजोरीत आधीच खडखडाट असल्यामुळे निवडणुकीसाठी लागणारा निधी कसा उभा करणार, हा प्रश्न पालिका प्रशासनापुढे उभा ठाकला होता. दरम्यान, शासनाकडे निधीची मागणी करूनही अद्याप निधी मिळालेला नाही. त्यामुळे नागरिकांकडून करण्यात कर वसुलीच्या पैशातून निवडणूक खर्च भागवण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले.

जालना शहर महानगरपालिकेची निवडणूक येत्या १५ जानेवारी रोजी होणार असून शुकवार, २ जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख होती. दरम्यान, दुपारी जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी पत्रकारांशी संवाद साधला. निवडणुकीच्या अनुषंगाने झालेल्या तयारीची माहिती मनपाचे उप आयुक्त केशव कानपुडे यांनी दिली. त्यानंतर निवडणूक खर्चाच्या निधीबाबत पत्रकारांनी पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित केला. त्यावर बोलताना मित्तल म्हणाल्या, निवडणुकीसाठी साधारणपणे ७ कोटी ४० लाखांच्या निधीची गरज असून तशी मागणी शासनाकडे करण्यात आलेली आहे. मात्र, अद्याप निधी उपलब्ध झालेला नाही. मात्र, आम्ही असे ठरवले आहे की, निवडणुकीचा खर्च महानगरपालिकेच्या निधीतून करू. त्यासाठी पालिकेने कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबविली. याचा फायदा झाला. शहरातील नागरिकांनी कर भरण्यासाठी पुढाकार घेतला. आतापर्यंत पालिकेकडे ३ कोटी ५० लाखांचा कर जमा झाला आहे. याशिवाय शासनाचा निधी देखील येईलच. तसेच शासनाकडे वस्तू व सेवा कर आणि स्टँपड्युटीचा निधी शासनाकडे प्रलंबित आहे, तो सुद्धा मिळणार आहे. त्यामुळे निवडणूक खर्च भागवण्यात येणार आहे, असे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले.

### खर्चाला कात्री

महानगरपालिकेची ही पहिलीच निवडणूक असल्यामुळे आम्हाला कमी खर्चात ती उत्तमरित्या पार पाडायची आहे. त्यासाठी आम्ही निवडणुकीतील खर्चाला देखील कात्री लावली आहे. कमीतकमी खर्चात निवडणूक घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहे, असेही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले.




## स्वच्छता मोहिमेदरम्यान जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केली मतदार जनजागृती

**जालना । प्रतिनिधी**




जालना शहरातील वीर सावरकर चौक येथे आयोजित स्वच्छता मोहिमेदरम्यान तथा जिल्हाधिकारी व आयुक्त जालना शहर महानगरपालिका आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला.

यावेळी नागरिकांना मतदान करणेबाबत शपथ देण्यात आली तसेच स्वाक्षरी मोहिमेच्या माध्यमातून मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा, मतदान हे केवळ अधिकार नसून कर्तव्यही आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी व आयुक्त आशिमा मित्तल यांनी यावेळी केले. स्वच्छता आणि लोकशाही या दोन्ही बाबी नागरिकांच्या सक्रिय सहभागातूनच यशस्वी होतात, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास शहरातील नागरिक, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच स्वीप (डतएएझ) टीमचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे मतदान करणार अशी शपथ घेतली व स्वाक्षरी मोहिमेत सहभाग नोंदविला. सदर उपक्रमामुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता वाढीस लागून जालना शहर महानगरपालिकेसाठी दि. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रिया पार पडणार असून निश्चितच या निवडणुकीत मतदान टक्केवारी वाढीस चालना मिळेल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला.

## संक्षिप्त

### पिंपरी डुकरी फाट येथे शेतकऱ्यांचे उपोषण यशस्वी



**जालना । प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील पिंपरी डुकरी फाटा येथे महावितरण सबस्टेशनसमोर शेतकऱ्यांनी सुरू केलेले अमरण उपोषण अखेर यशस्वी ठरले आहे. प्रशासन व महावितरणकडून लेखी आश्वासने मिळाल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले. या उपोषणातील प्रमुख मागणी आत्महत्या केलेले शेतकरी भागीरथ रामकिसन शिंदे (रा. हिवरा रोशनगाव) यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत होती. या मागणीची दखल घेत तहसीलदार, जालना यांनी कृषी विभागाकडून मृत्यूनंतर दहा दिवसांच्या आत दोन लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येईल, असे लेखी आश्वासन तलाठी ढाकरे यांच्याकडे दिले.

यासोबतच शेतकऱ्यांना दिवसा किमान दहा तास पूर्ण दाबाची वीजपुरवठा देण्याची मागणीही मान्य करण्यात आली. ही व्यवस्था जानेवारी अखेरीस पूर्ण करण्यात येईल, असे लेखी आश्वासन महावितरणचे कार्यकारी अभियंता, जालना यांनी दिले.रयत क्रांती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण मोहिते व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जालना तालुका अध्यक्ष कृष्णा खलसे यांच्या नेतृत्वाखाली हे उपोषण सुरू होते. प्रशासन व महावितरणकडून लेखी आश्वासने प्राप्त झाल्यानंतर उपोषणकर्त्यांनी आंदोलन मागे घेतले. यावेळी महसूल विभागाचे ढाकरे, मोजपुरी पोलीस ठाण्याचे एपीआय अतुल पाटील, महसूल विभागाचे श्रीराम राऊत, रामभाऊ मोहिते, डॉ. आप्पासाहेब कदम, सोपान काका भालेकर, कदीर सय्यद, विलास घाटे, मुक्तीराम आढव यांच्यासह सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.या यशस्वी आंदोलनामुळे शेतकऱ्यांच्या मागण्यांना न्याय मिळाल्याची भावना उपस्थित शेतकरी वर्गातून व्यक्त करण्यात आली.

### दिव्यांग अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत जिल्हास्तरावर आढावा -सचिव तुकाराम मुंढे

**मुंबई । प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या हक्कांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर सविस्तर आढावा बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली.

सचिव मुंढे म्हणाले, जिल्हा कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रश्न व तक्रारी ऐकून त्यांचे तत्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या उपाध्यक्षतेखाली विशेष बैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे. या बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या तक्रारी, त्यावर घेण्यात आलेले निर्णय तसेच करण्यात आलेली कार्यवाही यांचा सविस्तर अहवाल आयुक्त, दिव्यांग कल्याण तसेच शासनास सादर करण्यात येणार आहे. बैठकीदरम्यान शासनस्तरावर निर्णय किंवा कार्यवाही आवश्यक असलेल्या मुद्द्यांसाठी स्वतंत्र प्रस्ताव तयार करून तो शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर निर्णय घेण्यास मदत होणार आहे.

दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्यविषयक गरजांचा विचार करून सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सहकार्याने विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमधून आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला व आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध होणार असून, या उपक्रमांमुळे दिव्यांग अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समस्या अधिक प्रभावीपणे मार्गी लागतील, असे सचिव मुंढे यांनी सांगितले.

## उसतोड कामगारांसाठी समूहउपदेशन कार्यक्रम संपन्न

**परतूर । प्रतिनिधी**

हंगामी स्थलांतर करणाऱ्या उसतोड कामगारांच्या मानसिक, सामाजिक व कौटुंबिक समस्या लक्षात घेता त्यांना आरोग्य पोषन शिक्षण याचे मार्गदर्शन व आधार मिळावा या उद्देशाने समूहउपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला. या समूहउपदेशनामध्ये उसतोड कामगारांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कामाच्या ताणतणावामुळे उद्भवणाऱ्या मानसिक अडचणी, कुटुंबापासून दूर राहण्याची वेदना, आर्थिक अडचणी, व्यसनाधीनता, आरोग्य शिक्षण विषयक समस्या तसेच मुलांच्या शिक्षणाबाबतच्या चिंता या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

तज्ज्ञ समुपदेशकांनी संवादात्मक पद्धतीने कामगारांचे प्रश्न ऐकून घेत



सकारात्मक विचारसरणी, तणाव व्यवस्थापन, कौटुंबिक संवाद, व्यसनमुक्ती व आरोग्याची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. या मार्गदर्शक मा अप्पासाहेब उगले प्रकल्प संचालक मा भाउसाहेब गुजाळ जिल्हा संपर्क अधिकारी प्रकल्प व्यवस्थापक अश्वजित जाधव कार्यक्रमाच्या यशस्वी साठी जिल्हा समन्वयक एकनाथ राउत राजेश वाघमारे सुरेखा वाघमारे दुर्गा नाडे आकाश चैगुलै महादेव खरात योगेश आढे हे उपस्थित होते

## २ मृत शिक्षकांना निवडणूक ड्युटी, प्रशासनाचा निष्काळजीपणा

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी नगर मध्ये २ मृत शिक्षकांना महापालिकेने निवडणूक ड्युटी लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ३ आणि १३ महिन्यांपूर्वी मृत झालेल्या दोन शिक्षकांना प्रशिक्षणासाठी गैरहजर राहिल्याबद्दल नोटीसही बजावत कारवाईचा इशाराही दिला आहे.

पैठण तालुक्यातील संभाजी कर्डिले यांचे ३ महिन्यांपूर्वी, तर राजेश बसवे यांचे १३ महिन्यांपूर्वी निधन झाले. असे असतानाही त्यांना निवडणुकीच्या कामावर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर चुकीची उपरती न झालेल्या प्रशासनाने आता या मृत शिक्षकांना निवडणूक प्रशिक्षणाला गैरहजर राहिल्याबद्दल कारणे दाखवा नोटीस बजावत हलगर्जीपणाचा कळस गाठला. आयुक्तांनी दिलेल्या पत्रात म्हटले की, निवडणूक कामात हलगर्जीपणा दाखवल्याबाबतचा खुलासा नोटीस मिळाल्यापासून २४ तासांच्या आत सादर करावा, अन्यथा कारवाई करण्यात येईल. या आधीही दोन दिवंगत शिक्षकांवर महापालिका निवडणुकीसाठी मतदान अधिकारीपदाची जबाबदारी सोपवल्याचा प्रकार समोर आला होता. मृत शिक्षकांची नावे: संजय गुळवे: यांचे वर्षभरापूर्वीच निधन झाले होते. वंदना सोळुंके: यांचेही काही महिन्यांपूर्वी निधन झाले होते.




या प्रकारामुळे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे कर्मचाऱ्यांची अद्ययावत माहिती नसल्याचे उघड झाले. मृतांच्या नावावर निवडणूक ड्युटीचे आदेश निघाल्याने शिक्षक संघटना आणि नातेवाईकांकडून संताप व्यक्त करण्यात आला.

हा प्रकार समोर आल्यानंतर प्रशासनाने आपली चूक मान्य केली. या प्रकरणातील तांत्रिक त्रुटी सुधारण्याचे आणि भविष्यात असा प्रकार घडू नये यासाठी डेटा अपडेट करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले होते. अशा प्रकारच्या घटनांमुळे निवडणूक प्रक्रियेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले होते. अधिकृत माहितीसाठी तुम्ही छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळाला भेट देऊ शकता.

## निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले मनसेचे दोन उमेदवार गायब; कुटुंब, पक्षाच्या नेत्यांसोबतही संपर्क नाही

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले मनसेचे दोन उमेदवार कालपासून गायब झाले आहेत. अद्यापही या उमेदवारांचा त्यांच्या कुटुंबाशी किंवा पक्षाच्या नेत्यांशी संपर्क झालेला नाही. प्रभाग क्रमांक सतरा मधील राहुल जाधव आणि अंबरनाथ भालसिंग असे गायब झालेल्या मनसेच्या उमेदवारांची नावे आहेत. याबाबत अद्याप कुटुंबियांकडून पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

दरम्यान मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ म्हणाले की, केडगावचा इतिहास हा रक्तरंजित आहे. त्यामुळे कुटुंबीय जसे काळजीत आहेत तसेच आम्ही देखील काळजीत आहोत. याबाबत मनसे प्रमुख राज ठाकरे हे देखील पोलीस प्रशासनाशी संपर्कात असल्याची माहिती डफळ यांनी दिली. मात्र ही मनसे आहे, जर आमच्या अंगावर याल तर आम्ही शिंगावर घेऊ, असाही इशारा डफळ यांनी दिला.



अहिल्यानगर मनपात ६८ जागांसाठी निवडणूक होणार आहे. सर्वच पक्षाचे उमेदवार जोरदार तयारी करत आहेत. मनपा निवडणुकीत अर्ज माघारी घेण्याच्या पहिल्या दिवशी २८ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतले आहेत. एकूण ४७७ अर्जांपैकी ४४९ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिले आहेत. आज आणखी किती उमेदवार माघारी घेतात हे पाहावं लागेल...मात्र नगरकरांना येऊ घातलेल्या नगरसेवकांकडून काय अपेक्षा आहेत.

२०१८ च्या महानगरपालिका निवडणुकीनंतर अहिल्यानगरच्या राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल घडून आले आहेत. शहराच्या राजकारणात प्रभावी असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या दोन्ही पक्षांमध्ये फूट पडल्याने महानगरपालिकेतील राजकीय चित्र पूर्णपणे बदलले आहे. राष्ट्रवादीचे नगरसेवक अजित पवार गटाकडे, तर शिवसेनेचे नगरसेवक एकनाथ शिंदे गटाकडे गेल्याने महाविकास आघाडीतील सत्ताधारी नगरसेवकांची संख्या आता अवघ्या एक-दोनवर येऊन ठेपली आहे. मात्र, असे असले तरी आगामी निवडणुकीसाठी महाविकास आघाडीनेही कंबर कसली असून ती ताकदीने मैदानात उतरण्याच्या तयारीत आहे.

## श्री विठ्ठल बालक मंदिर व गिरीष ईंग्लिश स्कूल, चंदनझीरा येथे क्रीडा सप्ताहाचे उद्धाटन

**जालना । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी श्री विठ्ठल बालक मंदिर, गिरीष लिटील स्टार नर्सरी, गिरीष इंग्लिश स्कूल आणि श्री विठ्ठल प्राथमिक व माध्यमिक शाळेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या क्रीडा सप्ताहाचे दिमाखदार उद्धाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्धाटक व अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव जयंतजी बुरा उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून राज्य क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम, जालना तालुका क्रीडा समन्वयक शेख चांद पीजे आणि मुख्याध्यापिका श्रीमती शुभांगीताई येमूल यांची उपस्थिती होती.



मामान्यवरांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक स्वर्गीय नारायणराव येमूल, स्वर्गीय शकुंतलाताई येमूल आणि सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सिद्धार्थ कदम व शेख चांद पीजे यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व सांगत मोलाचे मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका शुभांगीताई येमूल यांनी खेळाद्वारे होणाऱ्या व्यक्तिमत्व विकासावर प्रकाश टाकला.

श्रीफळ फोडून व फीत कापून क्रीडा सप्ताहाचे अधिकृत उद्धाटन करण्यात आले. यानंतर खो-खो स्पर्धेने खेळांना सुरुवात झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक घारे यांनी केले, तर वरिष्ठ शिक्षक वाघ यांनी आभार मानले. या प्रसंगी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन समितीची बैठक संपन्न

**जालना । प्रतिनिधी**

नागरिकांना पाणी उपलब्ध करुन देणे खुप पुण्याचे काम आहे. नळाद्वारे पाणी उपलब्ध झाल्याने ग्रामीण महिला वर्गाचे आयुष्य पुर्णतः बदलणार आहे. नागरिकांसाठी पाणी पुरवठा हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. पुढील दहा वर्षाचा विचार करता जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर असलेली ग्रामीण पाणी पूरवठ्याची कामे वेळेत आणि गुणवत्तापुर्ण होणे गरजेचे आहे. जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामांची टाटा कन्सलटन्सी या त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक तपासणी करण्यात येत असून अहवालानूसार प्राप्त झालेल्या त्रुटीची पुर्तता तातडीने करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हास्तरावर स्थापन केलेल्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनची बैठक शुक्रवार दि.२ जानेवारी २०२६ रोजी पार पडली. या प्रसंगी त्या बोलत होत्या. या बैठकीस कार्यकारी अभियंता सर्जेराव शिंदे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अभियंता श्री.पाध्ये, उप अभियंता श्री.बोडखे, श्री.जवंजाळ, श्री.ठाकुर, स्वच्छता तज्ञ नम्रता गोस्वामी, उप कार्यकारी अभियंता पुजा बुलबुले, श्री.घोरपडे यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.




जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यातील अंबड, बदनापूर, भोकरदन, घनसावंगी, जाफ्राबाद आणि जालना या तालूक्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पूरवठा योजनेची कामे मंजूर झालेली आहे. तर उर्वरीत १२० व ७० गावांसाठी परतूर व मंठा तालुक्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यंत्रणेद्वारे २ ग्रीड पाणी पूरवठा योजना राबविण्यात येत आहेत. कंत्राटदारानेही गुणवत्तेचे काम करणे आवश्यक असून योजनेतील निकषानूसार शाखा अभियंत्यांनी प्रत्यक्ष हजर राहत कामे काळजीपुर्वक करावी, कामात कसूर केल्यास हयगय केली जाणार नाही. या कामात समावेश असलेल्या उपअभियंता यांनी केवळ कागदोपत्री कामे न करता आठवडाभरात किमान ४ वेळा क्षेत्रभेट देवून कामाची तपासणी करावी. मी सुध्दा विविध तालुक्यातील कामांना भेट देवून पाहणी करणार आहे.

तरी प्रत्येक कामांचे जिओ टॅगिंग छायाचित्र व व्हिडीओ अहवालासोबत सादर करावेत. दिलेल्या उद्दीष्टानूसार काम न केलेल्या अभियंता आणि कंत्राटदारविरुध्द कारवाई प्रस्तावित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत

पाणी पुरवठा विभागामार्फत सद्यस्थितीत सुरु असलेल्या कामाबाबत माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी यावेळी दिली. यामध्ये जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात एकुण ७३३ कामे मंजूर असून अंबड-१३८, बदनापूर-८१, भोकरदन-१५५, घनसावंगी-११८, जाफ्राबाद-११४ आणि जालना -१२७ या प्रमाणे आहेत. यापैकी ३१५ कामे पुर्ण झाली असून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तर ४०० उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकमार्फत ७ कामे सुरु आहेत. यावेळी संपुर्ण स्वच्छता अभियानातंर्गत जिल्ह्यातील सुरु असलेल्या कामाचाही आढावा घेण्यात आला. या बैठकीस शिक्षण, कृषी, वने, भुजल सर्वेक्षण आदि विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**